




**फिनोलेक्स इंडस्ट्रीतर्फे कर्मचारी वसाहतीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कर्करोग तपासणी शिबिरात मार्गदर्शन करताना कॅन्सरतज्ञ चैतन्य कोपीकर सोबत डॉ. सौ सुनिता चव्हाण, ए. बी. अत्रे, संजय मठ, श्री. तातुगडे डॉ. रमेश चव्हाण आदी तर दुसऱ्या छायाचित्रात मुकूल माधव फाऊंडेशनच्या रितू छाब्रिया, डॉ. लालेह बुशेरी, डॉ. ज्योती चव्हाण आदी मान्यवर. (छाया - राजू साळवी)**

# फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे 'कर्करोग निदान आपल्या दारी' उपक्रमाचा प्रारंभ

रत्नागिरी, १७ डिसेंबर (वार्ताहर) : फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड, मुकुल माधव फाऊंडेशन व प्रशांती कॅन्सर केअर मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'कर्करोग निदान आपल्या दारी' हा उपक्रम फिनोलेक्स कॉलनी परिसरात मंगळवारी दिवसभर राबविण्यात आला. मुकुल माधव फाऊंडेशनच्या रितू छाब्रिया यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम सुरू करण्यात आला.

फिनोलेक्स कॉलनी तसेच मुकुल माधव विद्यालय, गोळप, नेवरे या ठिकाणी महिलांसाठी हा उपक्रम १७ ते २० डिसेंबर दरम्यान राबविण्यात येत आहे. या शिबिराचे उद्घाटन चिरायु हॉस्पिटलच्या स्त्री रोग तज्ञ सुनीता चव्हाण यांच्याहस्ते करण्यात आले. या शिबिरात प्रशांती कॅन्सर केअरच्या संचालिका श्रीमती लालेह बुशेरी व तज्ञ डॉक्टरांच्या सहकार्याने अद्ययावत तपासणी व्हॅनमध्ये मॅमोग्राफी करण्यात आली.

याप्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात डॉ. सुनीता चव्हाण यांनी फिनोलेक्स कॉलनीतील महिलांना स्तनाच्या व गर्भाशयाच्या कर्करोगाबद्दल माहिती दिली. ४० च्या पुढील महिला, पाश्चिमात्य जीवनशैली, उशीरा लग्न व मातृत्व आणि बाळाला पुरेसे किंवा अजिबात स्तनपान न करणाऱ्या महिलांमध्ये स्तनाचा कर्करोग आढळतो असे त्यांनी सांगितले.

यावेळी जगप्रसिद्ध कॅन्सरतज्ञ डॉ. चैतन्य कोपीकर, डॉ. रमेश चव्हाण, डॉ. आशितोष मुळ्ये, फिनोलेक्स कंपनीचे श्री. तातुगडे, ए.बी. अत्रे, संजय मठ, डॉ. ज्योती चव्हाण, रक्षंदा अन्सारी, गौरी क्षीरसागर, टी.के. काकडे, सागर चिवटे, अभिजीत साळवी आदी मान्यवर उपस्थित होते.

स्त्रियांनी जागरूक राहून वेळेवर तपासणी केल्यास कर्करोगाचा धोका टाळता येतो. निदान करून स्तन न काढता कॅन्सरची गाठ काढता येते तसेच स्तन रिकन्स्ट्रक्शन करता येतो अशी माहिती डॉ. कोपीकर यांनी यावेळी दिली. स्तनाच्या कर्करोगाचे निदान करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मॅमोग्राफीची सुविधा फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड व मुकुल माधव फाऊंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नातून चिरायु हॉस्पिटल येथे सुरु करण्यात येणार असल्याचे ए. बी. अत्रे यांनी यावेळी सांगितले. ब्रेस्टचा कर्करोग असलेल्या महिलांनी केवळ ब्रेस्टच्याच युनीटमध्ये उपचार करावेत असे डॉ. बुशेरी यांनी यावेळी सांगितले. फिनोलेक्स संस्थेचे मुकुल माधव विद्यालय प्रकल्पामार्फत गरजू व आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्यांसाठी आरोग्य शिबिरे, स्वयंसेवी संस्थांना मदत, शैक्षणिक उपक्रमाद्वारे शालेय साहित्य, संगणक इत्यादींचे वाटप आदी कार्यक्रम राबविले जात आहेत.